**NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE**

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक २८.०४.२०२६ मंगळवार**

**(गुन्हे)**

**पोलीस ठाणे सदर :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

पोलीस ठाणे सदर हद्दीत, जैन मंदीर जवळ, सदर, नागपुर येथे राहणारे फिर्यादी रोशन हरीलाल तिरमले, वय ४० वर्षे हे व त्यांचा भाऊ असे दोघे वरच्या माळ्यावर तसेच, त्यांचे आई—वडील हे खालचे माळ्यावर राहतात. दिनांक २६.०४.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक २७.०४.२०२६ चे ०५.४५ वा. चे दरम्यान, फिर्यादीचे आई—वडील हे त्यांचे राहते खालच्या माळ्यावरील घराला कुलूप लावून कलकत्ता येथे फिरण्याकरीता गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे आई—वडीलांचे रूमचे कुलूप तोडून, आंत प्रवेश करुन, बेडरुममधील गोदरेजचे आलमारीतील सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती २,५०,०००/— रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सदर येथे सपोनि. शुभांगी पाटील ९५९४९५२९२८ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५, ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे कोतवाली :—** दिनांक २७.०४.२०२६ चे १९.३० वा. चे सुमारास, कोतवाली पोलीसांचे बिट मार्शल हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग करीत असता, त्यांना नियंत्रण कक्ष मार्फतीने बिनतारी संदेश प्राप्त झाला की, गुरू गोविंद सिंग बाजार नावाचे नवनिर्माणाधीन इमारतीसमोर, पुस्तक गल्ली, महाल, कोतवाली येथे एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ४५ ते ५० वर्षे वयाचे ईसम बेशुध्द अवस्थेत पडून आहेत. अशा माहितीवरून बिट मार्शल यांनी घटनास्थळी जावून पाहणी केली असता, तेथे प्राप्त वर्णनाचे ईसम झोपलेल्या बेशुध्द अवस्थेत मिळून आले. आजूबाजूला चौकशी केली असता, ते भिक्षा मागून आपला उदरनिर्वाह करून, पुस्तक गल्ली येथील कोणत्याही दुकानासमोर झोपत असल्याचे निष्पन्न झाले. पोलीसांनी त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाचे वर्णन— रंग— सावळा, चेहरा— लांबट, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट ८ इंच, केस— काळे—पांढरे बारीक, दाढी—पांढरी, अंगात— कत्थ्या रंगाचे स्वेटर व कत्थ्या रंगाची हॉफ पॅन्ट घातलेले आहे. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी अथवा नातेवाईकांनी पोलीस ठाणे कोतवाली येथे समक्ष किंवा संपर्क क्र. ०७१२—२७३८२८४ यावर संपर्क साधावा.

याप्रकरणी फिर्यादी सरतर्फे पोहवा. दिलीप अहिरवार यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे कोतवाली येथे पोउपनि. पद्माकर कुमटकर यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे भांडेवाडी :–** कु. साईना खान समीर खान, वय १८ वर्षे, रा. अब्बुमिया नगर, प्लॉट नं. १७७, मस्जीद जवळ, भांडेवाडी, नागपूर ही दिनांक १७.०४.२०२६ चे १०.३० वा. पासुन राहते घरी कोणाला काहीही न सांगता पोलीस ठाणे भांडेवाडी हद्दीतुन कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तीचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग– सावळा, चेहरा– लांबट, बांधा– सडपातळ, उंची– ४ फुट ६ इंच, केस– काळे लांब, अंगात– झिंगल बेल शाळेचा ड्रेस क्रिम रंगाचा शर्ट चॉकलेट रंगाचा फ्रॉक तसेच, पायात काळ्या रंगाचा शुज घातलेले आहे. भाषा– हिंदी बोलते.

**२) पोलीस ठाणे भांडेवाडी :–** शेख परवेज अब्दुल गणी मन्सुरी, वय २६ वर्षे, रा. प्लॉट नं. २५१, रामभुमी, विनोबा भावे नगर, भांडेवाडी, नागपूर हे दिनांक १५.०४.२०२६ चे ११.०० वा. चे सुमारास पोलीस ठाणे भांडेवाडी हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता, घरून ऑटो क्र. एम.एच.४९ सी.एफ. ६८४३ घेवून कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता, मिळून आले नाही. **वर्णन** रंग– गोरा, चेहरा– गोल, बांधा– मध्यम, उंची– ५ फुट ८ इंच, केस– काळे, अंगात– आकाशी रंगाचे चौकडीचे शर्ट व काळ्या रंगाची जिन्स पॅन्ट घातलेला आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलतात.



साईना



शेख परवेज

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :–**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, कोर्ट क्र. ०३ नागपुर. | ३२५६३४/२०१४ | कलम ४, ५ म.जु.का. | १) ईश्वर लोटन गौर, रा. हंसापूरी छोटी खदान, तहसील, नागपुर.<br>२) दिनेश भरतलाल जैन, रा. शांतीनगर घाट मागे, लाल नगर, नागपूर.<br>३) नरेश सुरेश हिवराळे, रा. जागनाथ बुधवारी, तबला मार्केट, पोलीस चौकी, नागपूर.<br>४) अमित हिरालाल गुप्ता, रा. शेंडे नगर, चाफेकर चक्की जवळ, नागपूर.<br>५) मोहम्मद शफी अब्दुल मुनाफ, रा. टेका आशीनगर, प्लॉट नं. ४६, | ०२.०५.२०२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | पाचपावली, नागपूर.<br>६) रिजवान कुरैशी हसन कुरैशी, रा. जाफर नगर, प्लॉट नं. ४१, पोलीस लाईन टाकळी, गिट्टीखदान, नागपूर<br>७) मोहम्मद जावेद मोहम्मद शकुर रा. नवाबपूरा मस्जीद जवळ, कोतवाली, नागपूर.<br>८) शाहदीप मोहम्मद शकील, रा. जागनाथ बुधवारी, टी.बी. वॉर्डसमोर, नागपूर.<br>९) मोहम्मद ईमरान मोहम्मद रशीद, रा. अनंत नगर, प्लॉट नं. २१, गिट्टीखदान, नागपूर.<br>१०) धिरज श्यामलाल ठाकुर, रा. आशिर्वाद नगर, हुडकेश्वर रोड, निलम मेडीकल स्टोअर्स समोर, नागपूर.<br>११) मनोज कृष्णराव डोनारकर, रा. टिमकी, दादरापूर, भानखेडा, नागपूर.<br>१२) शेख याकुन अली शेख गुलाब अली, रा. अवस्थी नगर, पोलीस लाईन टाकळी, नागपूर.<br>१३) दुर्गेश गणेश डागोट, रा. गंजीपेठ गणेश चौक, रिलायन्स टेलर्सचे बाजूला, नागपूर.<br>१४) रफीक खान अजीज खान, रा. जाफर नगर, समाधान नगर, मकसुद खान यांचे घरी किरायाने गिट्टीखदान, नागपूर.<br>१५) सुशील रामदास शिर्के, रा. त्रिमुर्ती नगर, प्लॉट नं. १३२, रिंग रोड, नागपूर.<br>१६) श्रीकांत रामकृष्णा जगनाडे, रा. जुनी शुक्रवारी तलाव मागे, नागपूर. | |

**स्वा/—**

**( मनोज राऊत )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**